स्व.गोपीनाथजी मुंडे, माजी उप मुख्यमंत्री व माजी केंद्रीय मंत्री यांचे औरंगाबाद येथे स्मारक उभारण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक: स्मारक-२०१५/प्र.क्र.६८/नवि-२४,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १७ सप्टेंबर, २०१९.

<u>संदर्भ</u> :- १) शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.स्मारक २०१५/प्र.क्र.६८/नवि-२४,दि.२.६.२०१५
२) शासन निर्णय नगर विकास विभाग क्र. स्मारक २०१५/प्र.क्र.६८/नवि-२४,दि.२९.५.२०१९

<u>प्रस्तावना</u> :-

औरंगाबाद येथे लोकनेते स्व.गोपीनाथजी मुंडे यांचे भव्य स्मारक उभारण्याचे शासनाने ठरविले असून, त्याअनुषंगाने स्मारकाचा आराखडा निश्चित करण्यासाठी शासनस्तरावर मा.मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती संदर्भाधीन शासन निर्णय दि.२.६.२०१५ अन्वये गठीत करण्यात आलेली आहे. सदर स्मारक उभारण्याचे काम शहर व औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) यांच्या मार्फत करण्यात येत असून, सदर स्मारक उभारण्याकरिता रु.५०.६१ कोटी निधी मंजूर करण्याबाबत व्यवस्थापकीय संचालक (सिडको) यांनी दि.३.१.२०१९ च्या पत्रान्वये शासनास विनंती केली होती. त्याअनुषंगाने, प्रस्तुत स्मारकासाठी शहर व औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) यांनी आवश्यक निधी उपलब्ध करुन सदर स्मारकाचे काम पूर्ण करून स्मारक औरंगाबाद महानगरपालिकेकडे हस्तांतरित करावे. तद्नंतर, प्रस्तुत स्मारकाच्या देखभालीचे व व्यवस्थापनाचे काम औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत करण्यात यावे. त्याचप्रमाणे शहर व औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) हे या स्मारकाचे काम पूर्ण करुन औरंगाबाद महानगरपालिकेकडे सूपूर्द करणार असल्यामुळे या स्मारकाच्या अनुषंगाने आवश्यक तो करारनामा सिडको व महानगरपालिका यांच्यामध्ये करण्यात यावा. असा निर्णय संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक २९.५.२०१९ अन्वये शासनाने घेतलेला आहे. तथापि, सदर शासन निर्णयात आता अंशत: बदल करण्यात येत असून शासनाने खालीलप्रमाणे सुधारित निर्णय घेतलेला आहे.

शासन निर्णय :-

अ) स्व.गोपीनाथ मुंडे,माजी उप मुख्यमंत्री यांचे औरंगाबाद शहरात स्मारक उभारण्याकरिता शासन निर्णय,नगर विकास विभाग दिनांक २.६.२०१५ मध्ये शासनाने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत नमूद करण्यात आलेले आहे. सदर तरतूदीमध्ये बदल करुन आता, स्व.गोपीनाथ मुंडे, माजी उप मुख्यमंत्री यांच्या औरंगाबाद येथील प्रस्तावित स्मारकासाठी आवश्यक निधी (रु.५०.६१ कोटींच्या मर्यादेत) सिडकोने उपलब्ध करुन स्मारकाचे काम पूर्ण करावे.

ब) तद्नंतर स्मारकासाठी आलेल्या खर्चाबाबतचा रु.५०.६१ कोटींच्या मर्यादेतील प्रस्ताव सिडकोने शासनास सादर केल्यानंतर त्यासाठी नियोजन विभागाकडून अतिरिक्त नियतव्यय मिळण्याच्या अधिनतेने निधीच्या उपलब्धतेनुसार स्मारकासाठी झालेल्या खर्चाची रु.५०.६१ कोटींच्या मर्यादेत प्रतिपूर्ती शासनाकडून सिडकोला मंजूर करण्यात येईल.

क) सिडकोने या प्रयोजनासाठी रु.५०.६१ कोटी पेक्षा जास्त खर्च केल्यास त्याची प्रतिपूर्ती शासनाकडून देय राहणार नाही.

ड) या प्रकरणी सिडकोने केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती शासनाकडून करावयाची असल्यामुळे सदर स्मारकाच्या देखभालीचे व व्यवस्थापनाचे काम देखिल सिडकोने करावे.

२. उपरोक्त नमूद निर्णयानुसार आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१९०९१३१८३९५६५९२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pradeep Patil

Digitally signed by Pradeep Patil
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=05334a0514755cf2d85a6ca44c91e73cfa81323e994582a4a27e428d216ef701, cn=Pradeep Patil
Date: 2019.09.17 15:15:59 +05'30'

(प्रदिप पाटील)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधानसचिव,मंत्रालय,मुंबई-३२
२) अपर मुख्य सचिव (नवि-१), नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई ३२.

३) विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद
४) आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद.
५) जिल्हाधिकारी, औरंगाबाद
६) उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको,निर्मल, दुसरा मजला,नरीमन पॉईंट,मुं.२१.
७) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई ३२.
८) मा.राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई ३२.
९) प्रधान सचिव, (नवि-२), नगर विकास विभाग, यांचे स्वीय सहाय्यक
१०) अवर सचिव (नवि-१०),नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई ३२.
११) निवड नस्ती (नवि-२४).